सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

दुरध्वनी क्र. ०२२-२५२२९३०३
Email ID-dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com

पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - १ यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग, चेंबुर, मुंबई-४०००७१

---

## प्रेस नोट

( दि. २५/०९/२०२६)
( मानखुर्द पोलीस ठाणे )

### अपहरण केलेला २ वर्षाचा चिमकुला ४० तासाच्या अथक प्रयत्नानंतर सुखरुप कुटुंबियांच्या ताब्यात

दिनांक २३/०९/२०२६ रोजी सायंकाळी सुमारे ०६ वाजेच्या सुमारास मानखुर्द येथील मार्केट रोड परिसरात कुटुंबियासोबत असतांना २ वर्षे ४ महिन्याचा चिमकुला अचानक बेपता झाला, त्याबाबत फिर्यादी यांनी माणखुर्द पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्यावरुन तात्काळ गु.र.क्र. ६२७/२०२६ कलम १३७(२) भारतीय न्याय संहिता अन्वये अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणाचे गांभीर्य व बालकाच्या सुरक्षिततेचे महत्व लक्षात घेऊन वरिष्ठांच्या मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे तात्काळ चिमकुल्याच्या शोधासाठी मानखुर्द, देवनार, आरसीएफ व ट्रॉम्बे पोलीस ठाण्यांची एकुण ८ पथके तयार करण्यात आली, बालकाचे अपहरण झाल्याचे निष्पन्न झाल्याने तपास पथकांनी या घटनेचा विविध शक्यतांच्या अनुषंगाने सखोल तपास सुरू केला. घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता एक महिला सदर बालकास घेवुन जातांना दिसत असल्याने त्याबाबत अधिक तपास सुरु केला, अपहरणकर्त्याच्या संभाव्य हालचाली व मार्गांचा मागोवा घेतला, संशयित व्यक्तींची माहिती व हालचालींची पडताळणी, उपलब्ध तांत्रिक माहितीचे विश्लेषण तसेच मानवी माहितीच्या आधारे विविध ठिकाणी शोधमोहीम राबविण्यात आली. बालकाला शहरातील अथवा शहराबाहेरील कोणत्याही ठिकाणी नेण्यात आले असण्याची शक्यता लक्षात घेऊन तपासाची व्याप्ती वाढविण्यात आली. रेल्वे स्टेशन

अखेर अपहरण झालेल्या बालकाचा व अपहरण करणा-या महिलेचा ४० तासाच्या दिवस-रात्र अथक प्रयत्नानंतर सुखरूप शोध घेण्यात पोलीसांना यश आले. सदर बालकाचे अपहरण करणारी महिला मुस्कान भोलाकुमार साह व तिला अपहरण करण्यास मदत करणारा तिचा पती भोलाकुमार जग्गु सहा दोन्ही रा. दुर्गामाता मंदिर गल्ली महाराष्ट्र नगर मानखुर्द मुंबई यांना मानखुर्द पोलीसांनी नमुद गुन्ह्यात अटक केली असुन त्यांना मा.न्यायालया समक्ष हजर करण्याची तजविज ठेवली आहे. सदर आरोपीतांच्या ताब्यातुन बालकाची सुखरुप सुटका करुन, त्याला त्याच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले आहे. चिमकुल्याचा शोध घेण्यासाठी दिवसरात्र केलेल्या अथक प्रयत्नामुळे एका कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असुन, पोलीसांच्या तत्पर सेवाभावामुळे त्यांच्या चेह-यावर आनंदाचे हास्य उमटले. संवदेनशील प्रकरणात तत्पर प्रतिसाद, सातत्यपुर्ण तपास आणि कर्तव्यनिष्ठ प्रयत्न हिच मुंबई पोलीसांच्या सेवाभावाची खरी ओळख आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त का. व सु. श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनजंय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त पुर्व परिमंडळ ०१ समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त ट्रॉम्बे विभाग प्रमोद कोकाटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिलाल शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देवळे, ओऊळकर, पाटील व तडवी, सपोनि हुलावळे, चव्हाण, कांबळे व गंगावणे, पोउपनि सुरडकर, साळुंखे, हिरवे व खोसे, पोहवा देसाई, पाटील, दरेकर, भाट, सोनवणे, शिंदे, पाटील, साळुंखे, पोशि पाटील, घोरपडे, सणस, तायडे, नाळे, चौधरी यांनी केली आहे.

***